# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०९/२०१८
## दि.०९/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ५३७/१८,भादविक ३२४,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | संतोष जाधव,वय-२७,रा.महमदवाडी,पुणे |
| **आरोपी** | तानाजी राजाराम गायकवाड,वय-३६,रा.सनं.४०/१,कृष्णानगर,गल्ली नं.२,महमदवाडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/२०१८ रोजी दु.१२/०० वा. कृष्णानगर,गल्ली नं.२,महमदवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा भाऊ सागर जाधव तसेच मंडळाचे कार्यकर्ते असे गणपती मंडळाचे मंडपा समोर उभे असताना,यातील नमुद इसम तानाजी गायकवाड याने त्याचे गणपती मंडळाची मनपाची कमान फिर्यादी यांचे गणपती मंडळाचे कमानी समोर लावत असताना,फिर्यादी हे तानाजी यास तु आमचे मंडळाचे कमानी समोर कमान लावु नको असे म्हणाल्याचे कारणावरून त्याने चिडुन जावुन फिर्यादी यांना शिवीगाळ व लाकडी दांडक्याने मारहाण करून डावे हातावर व पाठीवर फटका मारून जखमी केले. तसेच फिर्यादी यांचा भाऊ सागर हा भांडणे सोडविण्यासाठी आला असता,त्यासही शिवीगाळ करून हाताने मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. देवकाते ९९६०३३६६४५ |

## दि.१०/०९/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २२३/१८,भादविक ३४१,४२७,३४,सार्वजनिक मालमत्ता विध्वंस प्रति.अधि. १९८४ चे क.३ |
| **फिर्यादी** | सल्लाउद्दीन शेख,वय-५३,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | राजकीय पक्षाचे झेंडे हातात घेतलेले तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१८ रोजी सकाळी ०७/२० वा.विद्या परिषद बस स्थानक,कुमठेकर रोड,पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे मनपाचे परिवहन सेवेत चालक म्हणुन कार्यरत आहेत. फिर्यादी हे त्यांची ताब्यातील पीएमपीएमएलची बस हिचेतुन निलज्योती ते शनिपार या मार्गावरून प्रवासी वाहतुक करीत असताना,नमुद वेळी व ठिकाणी आले असताना,राजकीय पक्षाचे झेंडे हातात घेतलेले तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी व साक्षीदार तसेच बस मधील प्रवाशांना खाली उतरण्यास भाग पाडुन बसचे पुढील काचेवर पेवर ब्लॉकचे तुकडे फेकुन काच फोडुन बसचे पुढील चाकाची हवा सोडुन बसचे सुमारे १० हजार रू किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.एस.बी.पाटील ९८९२७५३३७४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २२४/१८,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | सोमनाथ यादव, पो.शि.बिबवेवाडी,पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | १)रोहित चंद्रकांत जानराव,वय १९ वर्षे,रा.शेळके वस्ती गिरणी शेजारी अप्पर बिबवेवाडी,पुणे २)अविनाश अर्जुन जोगन,वय २२ वर्षे,रा.सदर ३)एक विधीसंषर्धीत बालक व इतर चार (अ.क्र.१ व २ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०९/२०१८ रोजी पहाटे ०३/३० वा.चे सुमारास पद्मा सहकारी सोसायटी शेजारी, बिबवेवाडी,पुणे येथील स्टेट बँकेचे एटीएम सेंटरवर |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे एक लोखंडी कोयता, एक लोखंडी जांबीया इत्यादी घातक शस्त्रे तसेच मो.सा.नं.एमएच-१२/पीवाय-३६८८ असा एकुण २५,२००/- रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून, सदर भागात दहशत निर्माण करून, नमुद ठिकाणी असलेल्या स्टेट बँकेचे एटीएम सेंटरवर स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.आर.आडके ९७६३३३४४०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**